जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

'' प्रेस नोट '' दि. २६/०२/२०२६

'' ३० लाख ९१ हजार रूपये किमतीचा १२३.६४० किलो वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त ''

'' गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी ''

----------ooooo----------

दिनांक-२४/०२/२०२६ रोजी गुन्हे शाखा घटक ०१ ठाणे चे पोशि सागर सुरळकर यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की '' कळवा पोलीस स्टेशनचे हददीमध्ये नाशिक मुंबई महामार्गावरील खारेगाव टोल नाका येथुन मुंब्रा परिसरामध्ये एक कार मधुन ०२ इसम हे गांजा विक्री करण्यासाठी येणार आहे. '' मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा घटक ०१ चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी भिंवडी कडुन ठाण्याकडे येताना बंद असलेल्या खारेगाव टोलनाका, कळवा येथे सापळा कारवाई केली असता इसम क ०१) सागर गोविंद पवार, वय ३३ वर्षे, राह. ठी. मु. पो. नांदुर शिंगोटे, चासरोड, ता. सिन्नर, जिल्हा. नाशिक, क २) धोंडीराम चैतु भागडे, वय ५० वर्षे, राह.ठी. मु. पो. नांदगाव सदो, ता. इगतपुरी, जिल्हा. नाशिक यांनी त्याचे ताब्यातील हयुंडाई कंपनीची सॅन्ट्रो मोटार कार क्र. MH-02-AU-5585 हीच्या मधुन ०५ प्लास्टीकच्या गोण्यांमध्ये विक्री करण्याच्या उददेशाने वाहतुक करून आणलेला ३० लाख ९१ हजार रूपये किंमतीचा १२३.६४० किलो ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व वाहन जप्त करून सदर आरोपीत विरोधात **कळवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर १०३/२०२६, एन.डी.पी.एस.अधिनियम-८(क),२०(ब)(ii)(क), २९ प्रमाणे** गुन्हा नोंद करून आरोपीत यांना अटक करण्यात आली . अटक आरोपीत यांना दिनांक २८/०२/२०२६ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिंमाड मजुंर आहे. नमुद दाखल गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे कडून करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे मा.डॉ श्री पंजाबराव उगले , मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. अमरसिंह जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सचिन गायकवाड, पोलीस उप निरीक्षक दिपक घुगे, सहा.पो.उप निरी. सुनिल माने, पोहवा/शब्बीर फरास, संदीप महाडीक, प्रशांत निकुंभ, दिपक जाधव,शशिकांत सावंत, पोशि/सागर सुरळकर ,अमोल ढावरे , मयुर लोखंडे , प्रशांत लवटे यांनी केली आहे.